सन २०१७-१८ च्या टंचाई कालावधीसाठी माळपठार व ४० गांवे प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनेअंतर्गत समाविष्ट असलेल्या गावांसाठी तात्पुरत्या नळ पाणी पुरवठा योजनेस प्रशासकीय मान्यता देणेबाबत

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः टंचाई २०१८/प्र.क्र. ३१ /पापु १४
जी. टी. रुग्णालय इमारत संकुल, ७ वा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
दिनांक: १० एप्रिल, २०१८

वाचा :-

१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक: टंचाई १०९९/ प्र.क्र. १२/पापु १४, दिनांक ३.२.१९९९
२) विभागीय आयुक्त, अमरावती यांचे क्रमांक उपआ/विकास/पाणी टंचाई/अका/कावि ४४३/१८, दिनांक ३१.०३.२०१८ चे पत्र व प्रस्ताव
३) शासन पत्र, क्रमांक बैठक २०१७/प्र.क्र.१७०/पापु १४, दिनांक ०९.०४.२०१८ (बैठकीचे इतिवृत्त)

प्रस्तावना -

विभागीय आयुक्त, अमरावती यांनी सन २०१७-१८ च्या टंचाई कालावधीसाठी माळपठार व ४० गांवे प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनेअंतर्गत समाविष्ट असलेल्या गावांसाठी तात्पुरत्या नळ पाणी पुरवठा योजनेच्या रु. २४१.३६ लाख किंमतीच्या कामास प्रशासकीय मंजूरी मिळण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. सदर प्रस्ताव नागरी तथा ग्रामीण क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील तातडीच्या पाणीपुरवठा योजनांना/उपाययोजनांना प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अध्यक्षतेखालील स्थायी समितीच्या दिनांक ०३.०४.२०१८ रोजी झालेल्या बैठकीत मान्यतेसाठी विचारात घेण्यात आला.

विभागीय आयुक्त अमरावती यांनी माळपठार व ४० गांवे प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनेअंतर्गत तात्पुरत्या पाणी पुरवठा योजनेचा उद्भव असलेल्या जामनाईक १ येथील जॅकवेलजवळ योजनेस वर्षभर पुरेल एवढा पाणी साठा उपलब्ध आहे. त्यामुळे सदर जॅकवेलवर गर्डर टाकून नविन पंप बसविणे, विद्युत फिडरची दुरुस्ती व विद्युत वितरण कंपनीचे जोडणी शुल्क भरण्यासाठी तरतूद, सन २०१० मध्ये टाकलेल्या उर्ध्व वाहिनीची अपूर्ण कामे पूर्ण करुन त्याव्दारे अशुध्द पाणी जवळा येथे (५.२ कि.मी.) तात्पुरत्या साठवण टाकीमध्ये आणणे, जवळा येथे तात्पुरता पाणी साठवण चर खोदणे, तात्पुरत्या पाणी साठवण चरा वर गर्डर टाकून नविन पंपाव्दारे अस्तित्वातील जलशुध्दीकरण केंद्र फेट्रा गावापर्यंत नविन प्रस्तावित ७.२ कि.मी.HDPE पाईप लाईन व्दारे पाणी आणणे या बाबींच्या कामाचा समावेश असलेला प्रस्ताव शासनास सादर केला होता. सदर प्रस्तावावर दि. ०३.०४.२०१८ रोजीच्या सचिव स्तरीय स्थायी समितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा होऊन स्थायी समितीने रु. २४१.०६ लाख प्रस्ताव एवढ्या किंमतीच्या प्रस्तावास मंजूरी दिली. त्या अनुषंगाने मान्यता देण्यात आलेल्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

उपरोक्त प्रस्तावनेत नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेऊन माळपठार व ४० गांवे प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनेअंतर्गत समाविष्ट असलेल्या गावांसाठी तात्पुरती नळ पाणी पुरवठा योजनेत करावयाच्या प्रस्तावतनेत नमुद कामाचा समावेश असलेल्या एकुण रुपये २४१.३६ लाख किंमतीच्या प्रस्तावास खालील अटींच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

१) जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी माळपठार व ४० गांवे प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनेअंतर्गत समाविष्ट असलेल्या गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असल्याचे सर्व प्रथम घोषित करावे.

२) सदर प्रस्तावात नमूद केलेली तात्पुरती पूरक पाणी पुरवठा योजना कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यवतमाळ यांचेमार्फत राबविण्यात यावी.

३) सदर योजनेची कामे विहित पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येऊन करावीत. योजनेचे काम मान्यता प्राप्त किंमतीमध्येच पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी.

४) योजनेची निविदा अल्प मुदतीची (७ दिवस) काढण्यास परवानगी देण्यात येत आहे.

५) निविदा प्रक्रीया दिनांक १८ एप्रिल, २०१८ पर्यंत पूर्ण करुन कार्यारंभ आदेश देणे आवश्यक आहे.

६) निविदा प्रक्रीया दिनांक १८ एप्रिल, २०१८ पर्यंत पूर्ण न झाल्यास योजनेची मान्यता रद्द समजण्यात येईल.

७) योजनेची कामे दिनांक २० मे, २०१८ पर्यंत पूर्ण करुन योजनेतून पाणी पुरवठा सुरु होणे आवश्यक आहे. तथापि, या दिनांकापर्यंत योजनेतून पाणी पुरवठा सुरु न झाल्यास योजनेची मान्यता रद्द करण्यात येईल.

८) सदर योजनेची प्रस्तावात नमूद केलेली कामे कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यवतमाळ यांचेमार्फत पूर्ण करण्यात आल्यानंतर योजनेची देखभाल दुरुस्ती व योजनेचे व्यवस्थापन संबंधित ग्रामपंचायंतानां मार्फत करणे आवश्यक राहील.

९) विभागीय आयुक्त, अमरावती यांनी सदर योजनेकरिता निविदा प्रक्रिया झाल्यानंतर योजनेच्या सुरुवातीला ५०% इतका निधी द्यावा. उर्वरित निधी योजना कार्यान्वित झाल्यानंतर देण्यात यावा.

१०) प्रस्तुत उपाययोजनेसाठी वापरण्यात आलेले फ्लोटींग पंप (Floating Pump) व पाईप्स टंचाई कालावधीनंतर या उपाययोजनेसाठी वापर होणार नसेल तर सदर पंप व पाईप्स काढून ठेवून कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यवतमाळ यांच्या ताब्यात ठेवणे आवश्यक आहे. जेणेकरुन आवश्यकतेनुसार पुढील टंचाई कालावधीत त्यांचा वापर याच ठिकाणी अथवा अन्य ठिकाणी करणे शक्य होईल.

११) योजनेचे काम मुदतीत पूर्ण होणे आवश्यक असल्याने योजनेच्या निविदा प्रक्रीयेपासून ते योजनेतून पाणीपुरवठा सुरु होईपर्यंत आठवडयाच्या प्रत्येक सोमवारी प्रगती अहवाल शासनास पाठविण्यात यावा.

२. याबाबत होणारा खर्च मागणी क्र. सी-६, २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, ०१-अवर्षण, १०२ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, ९१ - राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च, (९१)(०१) पिण्याच्या पाण्याचा आकस्मिक निकडीचा पुरवठा (२२४५००९३) (दत्तमत) (वेतनेत्तर) - ३१, सहाय्यक अनुदाने या लेखाशिर्षाखालील तरतूदीमधून भागविण्यात यावा व त्याखाली अंतिमत: खर्ची टाकण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ नागरी व ग्रामीण क्षेत्रातील विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील तात्पुरत्या पाणी पुरवठा योजना / उपाययोजनांना प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी स्थापन केलेल्या सचिवस्तरीय स्थायी समितीच्या दिनांक ०३.०४.२०१८ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०४०९१५०८२८३५२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Mahesh Bhagwan Sawant

Digitally signed by Mahesh Bhagwan Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d1f670a17d77c8ddff69694de2a07b7ff855dafef954aefa82ca28bd6cc6adb6, cn=Mahesh Bhagwan Sawant
Date: 2018.04.10 14:11:16 +05'30'

(म. भ. सावंत)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
२. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर
३. अपर मुख्य सचिव, (म.व पु.) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सचिव, ग्रामविकास आणि जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
८. विभागीय आयुक्त, अमरावती
९. जिल्हाधिकारी, यवतमाळ
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ
११. अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती
१२. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यवतमाळ
१३. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, यवतमाळ
१४. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१५.उप सचिव (पापु १४) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१६ पापु १४ (निवडनस्ती)